**<u>विषय</u> :- दिनांक- ०३/०८/२०१७ रोजी अखिल महाराष्ट्र बेरड, बेडर रामोशी समाज कृती यांचे मोर्चाचे अनुषंगाने मोर्चा मार्गावरील रस्त्यांचा वाहतूकीकरीता वापर टाळण्या बाबत.....**

---

दिनांक ०३/०८/२०१७ रोजी,दुपारी १२.०० ते १५.०० या दरम्यान अखिल महाराष्ट्र बेरड,बेडर रामोशी समाज कृती समिती यांचेतर्फे रामोशी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी व इतर मागण्यांकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा,पुणे स्टेशन- साधु वासवानी चौक- कौन्सील हॉल,जिल्हाधिकारी कार्यालय पुणे पर्यंत मोर्चा काढणार आहेत सदर मोर्चाचे गर्दीचे दृष्टीने **<u>पुणे स्टेशन</u>, <u>कौन्सीलहॉल</u>** परिसरातील रस्ते व त्यांना जोडणारे इतर लहान रस्ते यावरील वाहतुक संथ होणार आहे तसेच आवश्यकतेनुसार सदर रस्त्यावरील वाहतूक वळविण्यात येणार आहे.

तरी सदर रस्त्यांचा वापर करणा-या सर्व वाहनचालकांनी / नागरीकांनी आपली गैरसोय टाळण्याकरीता वरील नमुद वेळे पुरता सदर भागातील रस्त्याचा वापर टाळून इच्छितस्थळी जाण्याकरीता इतर पर्यायी मार्गाचा वापर करावा.

याखेरीज वरील नमूद मार्गावरील वाहतूक कमीत-कमी वेळाकरीता वळविण्यात येणार आहे. तरी सर्व नागरिकांनी वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक शाखा, पुणे शहर यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.